पुढारी

# विद्यार्थ्यांनी अडचणींची माहिती सादर करावी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२१ या उन्हाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. परंतु, तांत्रिक कारणास्तव परीक्षा न देता आलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या unishivaji.ac.in/online.unishivaji.ac.in संकेतस्थळावरील लिंकवर पेपरची माहिती द्यावी, असे परिपत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

लोकमत

# तांत्रिक अडचण आलेल्यांची पुन्हा परीक्षा

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून सध्या उन्हाळी सत्रातील (मार्च-एप्रिल) परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. मात्र, तांत्रिका कारणास्तव काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता आलेली नाही. अशा विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात येणार असून त्याबाबतचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. ही परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंतिम मुदत गुरुवार (दि. ९) पर्यंत आहे.

उन्हाळी सत्रातील परीक्षा दि. १० ऑगस्टपासून सुरू झाल्या आहेत. काही विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणामुळे या परीक्षा संपेपर्यंत पेपर देता आला नाही. त्यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. आदी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी त्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. दरम्यान, परीक्षा मंडळाने सोमवारी एकूण १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल ऑनलाईन जाहीर केले. त्यात बी. टेक., बी. कॉम. आय. टी., बी. टेक्सटाईल., बी. एस्सी. फूड टेक., एम. ए. वुमेन स्टडीज, बी. कॉम. बँक मॅनेजमेंट, बी. व्होक. रिटेल मॅनेजमेंट, बी. एस्सी. फूड टेक., एलएलबी आदींचा समावेश आहे.

लोकमत



दीड वर्षानंतर सोमवारी शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या शंभर टक्के उपस्थितीने विद्यापीठ गजबजून गेले होते. (छाया : नसीर अत्तार)

# दीड वर्षानंतर शिवाजी विद्यापीठ गजबजले

## शिक्षक, कर्मचाऱ्यांची शंभर टक्के हजेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने तब्बल दीड वर्षानंतर शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि प्रशासनातील विविध विभाग सोमवारी गजबजले. शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांची शंभर टक्के उपस्थित राहिले. त्यांनी कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करत काम केले.

कोरोनामुळे शासन आदेशानुसार गेल्यावर्षी मार्चच्या अखेरीस विद्यापीठातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती अवघ्या पाच टक्क्यांवर आली. जूनच्या दरम्यान ती २० टक्के, तर ऑक्टोबरपासून ती ५० टक्के झाली. यावर्षी मार्चपासून पुन्हा लॉकडाऊन सुरू झाल्याने २५ टक्के उपस्थितीवर प्रशासकीय, अधिविभागांतील कामकाज करण्यात येऊ लागले. रोटेशन पद्धतीने अधिकारी, कर्मचारी कामावर येत होते, तर शिक्षकांनी वर्क फ्रॉम होमच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण सुरू ठेवले. जिल्ह्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने राज्य शासनाने सुधारित आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या शंभर टक्के उपस्थिती सोमवारपासून सुरू झाली. कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करत कर्मचाऱ्यांनी काम केले.

पुढारी

# आर. मुकुंदन यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार (दि. ७) रोजी टाटा केमिकलचे सीईओ आर. मुकुंदन यांचे झूम ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर दुपारी २.४५ वाजता व्याख्यान होणार आहे. 'इनोवेटिंग लीव्हरेजिंग सस्टेनेबिलिटी आणि डिजिटल अपॉर्च्युनिटी इन इंडिया' विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील.

पुढारी

# पत्रकारिता विद्यार्थ्यांचा विद्यापीठात स्नेहमेळावा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनांतर्गत सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा झाला.

अध्यक्षस्थानी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख व अध्यासनाचे माजी चेअर प्रोफेसर डॉ. रत्नाकर पंडित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व डॉ. पंडित यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वागत संदीप पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शर्वरी मधाळे हिने केले. समारंभाला सुशांत उपाध्ये, मतीन शेख, प्रशांत चुयेकर, विवेक पोर्लेकर, विजय कोळेकर, चैतन्य डोंगरे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.



**कोल्हापूर : पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रत्नाकर पंडित. सोबत डॉ. शिवाजी जाधव.**

पुढारी

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी केलेली मदत विद्यापीठाची 'बेस्ट प्रॅक्टिस' ठरावी

## कुलगुरू डॉ. शिर्के; निवृत्त शिक्षकांच्या शिष्यवृत्तीचे वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यांना आवश्यक ती मदत करणे ही शिवाजी विद्यापीठाची 'बेस्ट प्रॅक्टिस' ठरावी, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील सौरभ संजय पाटील व शिवानी हणमंत गायकवाड या पात्र विद्यार्थ्यांना 'निवृत्त शिक्षकाची शिष्यवृत्ती - २०२० - २०२१'चे वितरणप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते दोन्ही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.



**कोल्हापूर : विद्यापीठात 'निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्ती'च्या वितरण प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.**

डॉ. शिर्के म्हणाले, १९६५ ते १९९९ इतका प्रदीर्घ काळ अध्यापनाचे कार्य केल्यानंतर निवृत्त झालेल्या प्रा. बी. व्ही. खासबारदार यांनी विद्यापीठाकडे काही निधी दिला. त्यातून ही शिष्यवृत्ती दरवर्षी प्रदान करण्यात येते.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व अधिविभाग प्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. एन. एल. तरवाळ यांनी मनोगत व्यक्त केले. उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जी. आर. पळसे, आर. वाय. लिधडे, डी. डी. सावगावे आदी उपस्थित होते.